महाराष्ट्र शासन

**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org


क्र.तंशिप्र-१२२५/प्र.क्र.१४/जाहीर सूचना-२/केंप्रप्र/२०२५/२४०१ दिनांक - १८.०७.२०२५.

# जाहीर सूचना

संदर्भ क्रमांक - शासन पत्र क्रमांक संकीर्ण-२०२५/प्र.क्र.६२/आरक्षण-५, दिनांक १८.०७.२०२५

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरु झालेल्या आहेत. उमेदवारांनी सादर केलेल्या ऑनलाईन नोंदणी प्रवेश अर्जांची छाननी सुरु आहे. त्यामध्ये आरक्षित प्रवर्गा खालील काही उमेदवारांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्युएस) या आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी ईडब्ल्युएस चे प्रमाणपत्र सादर केले आहेत.

अशा सर्व उमेदवारांना कळविण्यात येते की, आरक्षित प्रवर्ग (SC, ST, OBC, VJ, NT, SEBC, SBC) म्हणून विनिर्दिष्ट केले आहे, त्यांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्युएस) चा लाभ घेता येणार नाही, याची सर्व संबंधीत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

अशा उमेदवारांनी संबंधित आरक्षित प्रवर्गासाठी आवश्यक कागदपत्रांसाहीत तक्रार निवारण कालावधीपर्यंत अर्जामध्ये योग्य ते बदल करुन घ्यावेत.

तसेच ज्या अभ्यासक्रमांसाठी तक्रार निवारण कालावधी उपलब्ध नाही उदा. वैद्यकीय, आयुष अशा अभ्यासक्रमांसाठी त्यांच्या नोंदणी कालावधीच्या अंतिम दिनांकापर्यंत टिकीट जनरेट करुन योग्य ते बदल करुन घ्यावेत.

सही/-
आयुक्त
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई